||अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (3rd Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
जनसंपर्क विभाग Public Relations Office

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १ ऑगस्ट, २०२२

जळगाव दि.०१ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कुलसचिवपदी डॉ.विनोद पाटील, वित्त व लेखा अधिकारीपदी सनदी लेखापाल रवींद्र पाटील यांची निवड झाली असून वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणून प्रा.अनिल डोंगरे, नवसंशोधन, नवोपक्रम व साहचर्य संचालकपदी प्रा.काशिनाथ पाटील आणि आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभागाच्या संचालकपदी प्रा.आशुतोष पाटील यांची निवड झाली आहे.

गेल्या आठवडयात या विविध पदांसाठी मुलाखती झाल्या. कुलसचिवपदी निवड झालेले डॉ.विनोद पाटील हे सध्या मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक म्हणून गेल्या साडे तीन वर्षांपासून काम पाहात आहेत. त्यांची मुळ आस्थापना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात असून या विद्यापीठात त्यांनी सहायक पूर्वलेखक, पध्दती विश्लेषक, प्रभारी संगणक केंद्र प्रमुख म्हणून काम केलेले आहे. त्यांना प्रशासकीय कामाचा २३ वर्षांचा अनुभव आहे. वित्त व लेखा अधिकारी म्हणून निवड झालेले सनदी लेखापाल रवींद्र पाटील यांची स्वत:ची फर्म आहे. सनदी लेखापाल म्हणून त्यांना १० वर्षांचा अनुभव आहे.

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणून प्रा.अनिल डोंगरे यांची निवड झाली आहे. ते सध्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक म्हणून काम पाहात आहेत. अध्यापन व संशोधनाचा २१ वर्षांचा अनुभव त्यांना आहे. दोन मोठे संशोधन प्रकल्प पूर्ण झालेले असून दोन पेटंट फाईल केलेले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सात विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्ण केलेली असून सहा विद्यार्थी सध्या संशोधन करीत आहेत. त्यांची चार पुस्तके प्रकाशित आहेत.

प्रा.काशिनाथ पाटील यांची नवसंशोधन, नवोपक्रम व साहचर्य संचालकपदी निवड झाली आहे. हे पद विद्यापीठाला पहिल्यांदाच मंजूर झालेले आहे. प्रा.पाटील हे सध्या सोमय्या विद्यापीठाच्या के.जे.सोमय्या कॉलेज ऑफ इंजिनिअरींग येथे संशोधन व विकास विभागाचे प्रोफेसर व डिन म्हणून काम पाहात आहेत. १९ वर्षांचा त्यांना अध्यापनाचा अनुभव असून दोन

पुस्तके प्रकाशित झाले आहेत. आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभागाच्या संचालकपदी निवड झालेले प्रा.आशुतोष पाटील सध्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात मराठीचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंदाचे प्रभारी प्रमुख म्हणून काम पाहत आहेत. त्यांना २० वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहा विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केलेली असून पाच विद्यार्थी संशोधन करीत आहेत. त्यांचे दोन संशोधन प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. कविता-रती वाङ्मय नियतकालिकाचे संपादक म्हणून ते काम पाहत आहेत. त्यांची पाच पुस्तके प्रकाशित आहेत.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयाच्या दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी